महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ११६ वा | दिनांक : ३१/०१/२०२५ | वार : शुक्रवार

## राज ठाकरेंनी अजितदादांप्रमाणे पहाटे कामाला लागावे : अमोल मिटकरींचा खोचक सल्ला



**अकोला :** भाजपला २०१४ मध्ये १२२ त्यानंतर २०१९ मध्ये १०५ जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे त्यांना १३२ जागा मिळाल्या हे समजू शकतो. मात्र अजित पवार यांना ४२ जागा कशा मिळाल्या? यावर कोणाचा तरी विश्वास बसू शकतो का? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला. या प्रश्नावरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी राज ठाकरेंचा समाचार घेतला. स्वत:च्या घरात झालेल्या पराभवाचा शॉक त्यांना दीड महिन्यांनी बसला, असे म्हणत राज ठाकरेंनी अजित पवारांसारखे पहाटे ५ वाजल्यापासून कामाला लागले पाहिजे, असा सल्ला देखील अमोल मिटकरींनी राज ठाकरेंना दिला.

अमोल मिटकरी यांनी नुकताच एक व्हिडीओ पोस्ट करत राज ठाकरेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. राज ठाकरेंनी विधानसभा निवडणुकांबद्दल उपस्थित केलेल्या प्रश्नांवर टीका करत आम्हाला मेहनत ४२ जागांपर्यंत घेऊन आली, असे प्रत्युत्तर अमोल मिटकरी यांनी दिले.

राज ठाकरेंना नेहमीच उशिरा उठून चिंतन करण्याची सवय आहे. विधानसभेत स्वत:च्याच घरातील दारुण पराभवानंतरच्या दीड महिन्यांच्या कालावधीनंतर आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४२ जागा कशा आल्या? हा धक्का त्यांना बसला आहे. आम्ही त्यांना सांगतो की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजितदादा ज्याप्रकारे रात्रंदिवस काबाडकष्ट करतात, मेहनत घेतात. मग शेती असेल, कला असेल किंवा राजकारण असेल त्यात मेहनत ४२ जागांपर्यंत घेऊन आली आहे, असे अमोल मिटकरी यांनी सांगितले.

आपल्या सुपुत्राचा दारुण पराभव का झाला आणि आपल्या जागा का निवडून आल्या नाहीत, यावर त्यांनी भाष्य करावे. अजित पवारांप्रमाणे पहाटे ५ पासून त्यांनी कामाला लागले पाहिजे. त्याशिवाय अजितदादा नावाचा विकासपुरुष त्यांना कळू शकणार नाही, असा टोलाही अमोल मिटकरी यांनी राज ठाकरेंना लगावला.

दरम्यान, राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात भाजपचा देखील समाचार घेतला. यावेळी त्यांनी ज्यांच्यावर आरोप होतो, ते नंतर भाजपसोबत येतात, असा आरोप देखील केला. या आरोपांवरून भाजप आमदार आशिष शेलार यांनी पलटवार केला. भारतीय जनता पक्षाने तडजोडीचे राजकारण कधीच केले नाही. प्रथम राष्ट्र आणि राष्ट्रवादी विचाराच्या आधारावर राष्ट्रनिर्माण या आधारावर राजकारण करताना आम्ही कधीच तडजोड केली नाही. राज ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाच्या राज्यस्तरीय पदाधिकारी मेळाव्यात जो एक नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न करत आहेत, तो अर्धवट माहितीच्या आधारावर आहे, असे शेलार म्हणाले.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. या मेळाव्यातून त्यांनी प्रथमच विधानसभा निवडणुकीवर भाष्य करत निवडणुकांच्या निकालावर संशय व्यक्त केला. भाजपला २०१४ मध्ये १२२ त्यानंतर २००५ जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे त्यांना १३२ जागा मिळाल्या हे समजू शकतो. मात्र अजित पवार यांना ४२ जागा कशा मिळाल्या? यावर कोणाचा तरी विश्वास बसू शकतो का? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

ज्या शरद पवार यांच्या जीवावर आजपर्यंत अजित पवार आणि छगन भुजबळ राजकारण करत आले. त्या शरद पवार यांना केवळ दहा जागा मिळतात? हे न समजण्याची गोष्ट असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. त्यामुळे मतदानाच्या आकडेवारीवर जाऊ नका. लोकांनी आपल्याला मतदान केलेले आहे. केवळ ते आपल्यापर्यंत आलेले नाही, असे देखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे. लोकांनी आपल्याला मतदान केले. मात्र केलेले मतदान हे कुठेतरी गायब झाले. अशा प्रकारे जर निवडणूक लढवायच्या असतील तर निवडणूक न लढवलेल्या बरे, असे देखील राज ठाकरे यांनी म्हटले.

## संविधानात फक्त दुरुस्ती शक्य, बदल नाही : मंत्री चंद्रकांत पाटील

**पुणे :** केवळ राजकीय फायद्यासाठी विरोधकांनी देशाचे संविधान बदलण्यात येणार असल्याचा गैरसमज समाजामध्ये पसरवला. त्याचा काहीसा राजकीय लाभ त्यांना मिळाला आहे, परंतु देशातील लोक अशा अफवांना बळी पडणार नाहीत. देशाचे संविधान कोणालाही बदलता येणार नाही त्यामध्ये केवळ दुरुस्ती करता येते, अशा प्रकारे संविधानामध्ये अनेकदा दुरुस्ती करण्यात आली आहे, असे राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तर्फे आयोजित आठव्या युवा संसदेचे उद्घाटन नऱ्हे येथील संस्थेच्या सभागृहात झाले. यावेळी माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यावेळी उपस्थित होते. संस्थेच्या 'उडान' या अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार अरविंद सावंत यांना आदर्श खासदार पुरस्कार, सुधीर मुनगंटीवार, सत्यजित देशमुख आणि अमित गोरखे यांना आदर्श आमदार पुरस्कार, विठ्ठल काटे यांना आदर्श नगरसेवक पुरस्कार, सचिन शेलार यांना आदर्श सरपंच पुरस्कार, ॲड. मंगेश ससाणे यांना आदर्श युवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, राजकारणाबद्दल तळागाळामध्ये द्वेष आणि चीड निर्माण झाली आहे. परंतु अशा प्रकारे राजकारणाबद्दल द्वेष का निर्माण झाला आहे याचाही विचार करणे गरजेचे आहे. अनेकजण आज केवळ पैसा मिळवण्यासाठी राजकारणामध्ये येतात हा विचार सर्वसामान्यांमध्ये रुजला आहे, परंतु राजकारण हे समाजकारण करण्याचे एक साधन आहे. ही भावना आजच्या तरुणांमध्ये रुजवली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समृद्ध भारत घडू शकेल. राजकारणामध्ये तरुणांनी जाऊ नये हा भ्रम दूर केला पाहिजे, तसेच राजकारण म्हणजे केवळ निवडणूक हा गैरसमजही दूर झाला पाहिजे. निवडणूक हे राजकारणामध्ये येण्याचे केवळ एक माध्यम आहे परंतु निवडणूक म्हणजे राजकारण नाही.

भागवत कराड म्हणाले, सशक्त भारत घडविण्यासाठी संस्कारक्षम तरुण पिढीची गरज आहे. आज संस्कारक्षम तरुण घडविण्याचे काम जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट शिक्षण आणि युवा संसदेच्या माध्यमातून करत आहे. युवकांनी राजकारणामध्ये निश्चितच आले पाहिजे, परंतु राजकारणामध्ये येताना आपण कशासाठी राजकारणामध्ये येणार आहोत हे स्पष्ट पाहिजे. अन्यथा केवळ पैसा आणि सत्तेसाठी राजकारणामध्ये आलात तर त्या ठिकाणी फार काळ टिकू शकत नाही.

अरविंद सावंत म्हणाले, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जात, धर्म, पंथ विसरून समाजासाठी एकत्र यावा, असे आवाहन केले होते. परंतु आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये जात आणि धर्मावरून वाद निर्माण होत आहेत. ही भांडणे लावणारे लोक मात्र सत्तेचा आनंद घेत आहे हे सर्व सामान्य लोकांनी लक्षात घेतले पाहिजे. आजचे राजकारण हे सुसंस्कृत राजकारण राहिलेले नाही या राजकारणामधून समाजकारण कधीच दूर गेले आहे.

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A. (मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३१ जानेवारी २०२५

## लहान मोठ्या स्पर्धांतून मुलांचा आत्मविश्वास वाढतो : कावेरी दाभाडे



**कन्नड (अरूण थोरात) :** लहान मोठ्या स्पर्धांतून विद्यार्थी, मुलां मध्ये आत्मविश्वास वाढतो. त्यांच्या कला गुणांना पालकांनी प्रोत्साहन द्यावे असे अवाहन सामाजिक कार्यकर्त्या तथा कळंकी येथील ग्रामपंचायत सदस्य कावेरीताई दाभाडे यांनी केले आहे.त्या जि.प.उच्च प्राथमिक शाळा कळंकी ता.कन्नड येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित गुणवान विद्यार्थी सत्कार प्रसंगी बोलत होत्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रमोद थोरात हे होते. पुढे त्या म्हणाल्या की, गुणवान विद्यार्थी, स्पर्धकांना मिळालेले बक्षीस लहान की मोठे यापेक्षा बक्षीस मिळाल्याचा त्यांना अधिक आनंद असतो. ग्रामीण भागातील मुल्यां मध्ये प्रतिभा ठासून भरली आहे. त्यासाठी त्यांना योग्य माध्यम, संधी व प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे.

यासाठी आम्ही त्यांना मदत करु, असे आश्वासन ही त्यांनी दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राहुल राठोड, तर सुत्रसंचालन जे.एस. सोनावणे, आभार प्रदर्शन डी.जी. गुडलावार यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी कलागुणांचे दर्शन घडविणार्या गायन, पथनाट्य, वकृत्व आदी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. विविध क्रिडा स्पर्धांत सहभागी मुलांना बक्षीस वितरण करण्यात आले.

याप्रसंगी सरपंच विजयाबाई गुंजेकर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रमोद थोरात, उपाध्यक्ष रमेश थोरात, रावजी पथवे, रमेश अण्णा थोरात, तुकाराम थोरात, जगन्नाथ दाभाडे, पोलीस पाटील काळू पथवे, रामेश्वर थोरात, सुकदेव थोरात, नितीन आगळे, हरी थोरात आदी सह ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## अनुजा काकडेचा विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र हस्ते सन्मान




**कन्नड (अरुण थोरात):** वाहतुकीच्या नियमाच्या बाबतीत, रस्ता सुरक्षा, अपघात टाळण्याचे निगडित, अपघात झाल्यास करावयाच्या उपायोजना योग्य ती जनजागृती करण्यासाठी पोलीस महाअधीक्षक महामार्ग सुरक्षा पथक प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजी नगर, संभाजीनगर ग्रामीण पोलीस दल व शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

त्यातील निबंध स्पर्धेत अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाचे भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयाची विद्यार्थिनी अनुजा तातेराव काकडे हिने योग्य मत मांडून उत्कृष्ट लिखाण केल्याबद्दल जिल्ह्यातून प्रथम क्रमांकास पात्र ठरली. अनुजा काकडे हिने, अपघात समस्येवरील उपाय योजना या विषयावरती लिखाण केले होते.

निवड झाल्याबद्दल पोलीस निरीक्षक कार्यालय छत्रपती संभाजी नगर येथे विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, पोलीस निरीक्षक डॉक्टर विनय कुमार राठोड यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

संस्थेचे प्रमुख अशोकदादा गरुड, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, प्रा. निवृत्ती दाभाडे, सुनिता वाघ, शिल्पाताई गरुड, सचिन कापुरे, उपशिक्षणाधिकारी एस.पवार, आदित्य गरुड, पोलीस उपनिरीक्षक रामदास निकम, राजेंद्र पालवे, पालक तातेराव काकडे, पुंडलिक काकडे, सचिन जाधव, प्रकाश निळ, पुंडलिक सपकाळ, शेनफडू जंगले, सुनील गोरे, विजय साळवे, रंजना काकडे, वैशाली गोरे, गंगाताई पारवे, निशा काकडे, ज्ञानेश्वर देशमुख, जयश्री ढोणे, बेबी भडगे आदींनी अभिनंदन केले.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ८९ व ९० व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळांचे आयोजन






३१ जानेवारी १९२०

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक' या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
हे पाक्षिक मुंबईहून निघत असे. पांडुरंग नंदराम भटकर नावाच्या महार जातीच्या शिक्षित तरुणाने या पाक्षिकाचे संपादन केले.
पहिल्या अंकातील 'मनोगत' नावाचा अग्रलेख आंबेडकरांनी स्वतः लिहिला होता.
मूकनायकासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २,५०० रुपयांची आर्थिक मदत दिली होती.




**छत्रपती संभाजी नगर :** आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, ३१ जानेवारी १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "मूकनायक" या पाक्षिकाची सुरुवात केली होती. त्या मूकनायकच्या १०५ व्या वर्धापनदिनानिमित्त फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल च्या वतीने दोन वेगवेगळ्या ठिकाणी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

८९ वी वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा : तारीख : ३१ जानेवारी २०२५ वेळ : दुपारी २:३० वाजतास्थळ : कार्यालय : बुद्धिष्ट इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चर्रस एंड ट्रेडर्स असोसिएशन (बिमाटा), स्टरलाईट समोर, बँक ऑफ इंडिया जवळ, बजाजनगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. विषय : आधुनिक लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक पूर्ववर्ती शर्थीचे पालन केले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (२२ डिसेंबर १९५२, पुणे) उद्घाटक : मा. मिलिंद थोरात (अध्यक्ष : बुद्धिष्ट इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चर्रस एंड ट्रेडर्स असोसिएशन, बिमाटा) प्रमुख वक्ते : प्रा. संजय सांभाळकर (उपप्राचार्य : दगडुजी देशमुख महाविद्यालय, बजाजनगर, छत्रपती संभाजी नगर) अध्यक्षता : मा. बी. बी. मेश्राम (संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती छत्रपती संभाजी नगर)

९० वी कार्यशाळा : स्थळ : साकेत बुद्ध विहार, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. दिनांक : ३१ जानेवारी २०२५वेळ : सायंकाळी ६ :३० वाजता, विषय : मूकनायक १०५ वा वर्धापनदिन व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता.

उदघाटक : मा. बुद्धभुषण जाधव (अभ्यासक : पत्रकारिता) विशेष मार्गदर्शक : मा. कोमल पोळ (अभ्यासक : पत्रकारिता व कायदे शास्त्र) प्रमुख उपस्थिती : इंजिनिअर भास्कर म्हस्के (अध्यक्ष : साकेत बुद्ध विहार समिती) प्रमुख वक्ते : प्रा. डॉ. मिलिंद आठवले (सामाजिक कार्यकर्ते, छत्रपती संभाजी नगर) अध्यक्षता : मा. बी. बी. मेश्राम ( संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल छत्रपती संभाजी नगर) सर्व नोंदणीकृत उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे.

तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे. करिता ८९ व ९० व्या वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३१ जानेवारी २०२५


## गुरूमिश्री होमिओपॅथीक महाविद्यालयात विविध विषयांवरील प्रदर्शन आणि मार्गदर्शन सत्र





**बदनापूर (डॉ. रामेश्वर पाटील) :** गुरूमिश्री होमिओपॅथीक महाविद्यालयात फार्मसी, फिजिओलॉजी आणि पॅथोलॉजी विषयांवर प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. कंचन देसरडा मॅडम, डॉ. बी. एल. दूधमल सर, डॉ. प्रशांत तांबोळी, डॉ. जगदीश दरक आणि डॉ. देवांगीनी ब्रोकर यांच्या हस्ते पार पडले.

द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना पॅथॉलॉजी विषयाच्या संदर्भात डॉ. मनीष न्याती आणि डॉ. किरण सिरसाठ यांचे मार्गदर्शन लाभले. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी फार्मसी विषयावर डॉ. कविता खंदारे, डॉ. धनश्री सबनीस आणि डॉ. संजना यांनी मार्गदर्शन केले.

तसेच, फिजीओलॉजी विषयात डॉ. कासलीवाल आणि डॉ. किरण सिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना अमूल्य मार्गदर्शन दिले. सदरील प्रदर्शन पाहण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. सुजित पाल, डॉ. तुफान चक्रवर्ती, गोविंद थोटे, डॉ. रामेश्वर पाटील, डॉ. सुमित जांगडा, डॉ. दिपाली, डॉ. सायली व्यवहारे, डॉ. मीनल राचेरवाल आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान, विद्यार्थ्यांनी विविध शास्त्रशुद्ध मॉडेल्स आणि प्रदर्शने सादर केली, ज्यामुळे त्यांच्यातील शास्त्रज्ञानाचा आदान-प्रदान झाला. या सत्रांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयांमध्ये अधिक सखोल ज्ञान मिळवण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले आणि त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांना प्रेरित केले.

## मला न्याय मिळाला नाही तर इथेच आत्महत्या करणार : सोमनाथ सूर्यवंशीच्या आईचा इशारा

**परभणी :** तुम्ही मला न्याय दिला नाही मी इथेच आत्महत्या करून माझा जीव देणार, असा इशार सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आईने दिला आहे. परभणीमध्ये झालेल्या संविधान विटंबना घटनेनंतर घडलेल्या हिंसा प्रकरणानंतर पोलिसांनी धरपकड करत अनेकांना अटक केली. यात सोमनाथ सूर्यवंशी यांना देखील अटक करण्यात आली होती. मात्र, त्यांचा न्यायालयीन कोठडीमध्ये असतानाच मृत्यू झाला होता.

परभणीच्या या घटनेला आता दीड महिना पूर्ण होत आला असला तरी देखील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला नाही. यामुळे वंचित बहुजन आघाडीतर्फे मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चानंतर जिल्हाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी सोमनाथ यांची आई गेल्या होत्या. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्यासमोर त्यांनी आक्रोश व्यक्त केला. तसेच तुम्ही मला न्याय दिला नाही मी इथेच आत्महत्या करून माझा जीव देणार, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे. माझा जीव गेला तरी बेहत्तर पण मी न्याय घेणारच, अशी भूमिका सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आईने घेतली आहे.

परभणीतील दिवंगत सोमनाथ सूर्यवंशी, आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ नेते विजय वाकोडे तसेच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय देण्याच्या मागणीसाठी आज परभणीत वंचित बहुजन आघाडीकडून जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. शहरातील शनिवार बाजार येथील मैदानापासून हा मोर्चा प्रमुख मार्गावरून जिल्हाधिकारी कार्यालयावर करण्यात आला. यावेळी या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने वंचित बहुजन आघाडीचे राज्याचे तसेच जिल्ह्याचे पदाधिकारी, महिला, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी मोर्चात सहभागी कार्यकर्त्यांनी हातात संविधानाचे फलक घेवून मोर्चेकरांनी जोरदार घोषणाबाजी केली. दरम्यान सरकार जाणून-बुजून या तीनही कुटुंबीयांना न्याय देत नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. मात्र आम्ही न्यायालयीन लढा लढू पण आम्ही या प्रकरणांमध्ये न्याय मिळवून देऊ, अशी भूमिका वंचितच्या नेत्यांनी घेतली आहे.

## लाडक्या बहिणींना ॲडव्हान्स पैसे देता पण कष्टकऱ्यांना नाही



**अमरावती :** लाडक्या बहिणींना ॲडव्हान्स पैसे देता आणि कष्ट करणाऱ्या लोकांना पैसे देत नाहीत, असे म्हणत प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. लाडकी बहीण योजना ही सत्तेसाठी आणलेली योजना आहे. दिव्यांग नागरिकांना 6 महिने झाले पैसे भेटले नाहीत, असे बच्चू कडू म्हणाले आहेत.

बच्चू कडू यांनी एमपीएससी परीक्षांवर देखील भाष्य केले आहे. ते म्हणाले, याबाबत राजकारणी आणि प्रशासनातील लोकांना फार गांभीर्य नाही. शहरात युवक अभ्यास करून नोकरीसाठी प्रयत्न करत असतात. तरी नोकरी मिळत नसेल तर काय बंदुक घ्यावी का हातात? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

भाजप नेते व मंत्री चंद्रकांत पाटील व उद्धव ठाकरे यांची भेट झाली होती. यावर प्रतिक्रिया देताना बच्चू कडू म्हणाले, राज्यापेक्षा केंद्र सरकार महत्वाचं आहे. केंद्रात अजित पवारांपेक्षा शरद पावर आणि उद्धव ठाकरे सक्षम आहेत, असे बच्चू कडू म्हणाले आहेत. तसेच बीड प्रकरणावर बोलताना ते म्हणाले की रामाचे मंदिर बांधून देशावर उपकार केले पण त्याचे रामराज्य तयार झाले पाहिजे. अनेक वाल्मीक कराड आहेत. पण कष्ट करणारे उपाशी मरतात हे दुर्दैवी असल्याचे बच्चू कडू म्हणाले आहेत.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. यावर बच्चू कडू म्हणाले, ही देशातील पहिली घटना आहे की, सत्तेतील माणूस राजीनामा मागतोय आणि सत्तेतील माणूस राजीनामा देत नाही. काही लोक याचे राजकारण करत आहेत. कोणत्या गोष्टीचे राजकारण करावे कोणत्या नाही, याचे ताळमेळ राहिला नाही, असे ते म्हणाले आहेत.

## वाहनधारकांना अडवून लुटमार करणाऱ्या तिघांना अटक




**हिंगोली :** वसमत ते खांडेगाव रस्त्यावर थोरावा पाटीजवळ ॲटो अडवून मारहाण करीत पैसे लुटणाऱ्या थोरावा येथील तिघांना वसमत ग्रामीण पोलिसांच्या पथकाने अटक केली असून त्यांना गुरुवारी ता. ३० वसमत न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने तीन दिवस पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत ते खांडेगाव मार्गावर थोरावा पाटीजवळ अनोळखी तीन चोरट्यांनी बुधवारी ता. २९ रात्री दुचाकी अडवली. यावेळी दुचाकीस्वार रमेश श्रावणे (रा. वसमत) यांना मारहाण करून त्यांना जखमी केले त्यानंतर त्यांच्या खिशातील सात हजार रुपये लुटले. या प्रकारामुळे रमेश हे घाबरून गेले होते. चोरट्यांच्या तावडीतून सुटका करून त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. त्यानंतर चोरट्यांनी एका ॲटो चालकाला थांबवून ॲटोची तोडफोड केली.

या प्रकरणी रमेश श्रावणे यांनी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुरुवारी ता. २९ रात्री उशीरा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन बोराटे, उपनिरीक्षक एकनाथ डक, जमादार अविनाश राठोड, साहेबराव चव्हाण, विजय उपरे, आंबादास विभुते यांच्या पथकाने परिसरात शोध मोहिम हाती घेतली होती. यामध्ये वसमत तालुक्यातील थोरावा येथील काही जणांचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यावरून पोलिसांनी आज थोरावा येथे जाऊन अनिकेत पांचाळ, केशव पांचाळ, दीपक पांचाळ यांना अटक केली. पोलिसांनी त्यांची अधिक चौकशी सुरु केली आहे.

दरम्यान, त्यांना वसमतच्या न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांची तीन दिवस पोलिस कोठडीत रवानगी केली आहे. त्यांच्याकडून लुटमारीची आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३१ जानेवारी २०२५


# मूकनायक सारखी परिवर्तनवादी वर्तमानपत्रे ही काळाची गरज आहे




मित्र हो, आपण सर्वांना ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० ला मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात केली होती. त्याला शतकापेक्षा जास्त काळ लोटला असून या ३१ जानेवारीला १०५ वा ऐतिहासिक वर्धापनदिन आहे. त्या अनुषंगाने वर्तमानात प्रचार प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात आपण नेमकेपणाने कुठल्या वळणावर आहोत? याची शहानिशा होणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या मूकनायक च्या दर्शनी भागावर "काय करू आता धरुनिया भीड। नि:शंक हे तोंड वाजविले।।नव्हे जगीं कोणी मुकीयांचा जाण। सार्थक लाजून नव्हे हित।। अशा राष्ट्रसंत तुकोबारायांच्या अभंगातील ओळी उधृत केल्याचे दिसून येते. यावरून तुकोबारायांच्या विचारांच्या वैचारीक प्रगल्भतेची डॉ. आंबेडकरांनी जाणीवपूर्वक नोंद घेतल्याचे पहायला मिळते. अर्थात तुकोबारायांच्या विचारांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या परिवर्तनवादी विद्रोही विचारांचा वारसा पुढे चालविणाचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केलेल्या लिखाणावरून पहायला मिळतो.

ज्या काळात समाज जीवनात नगण्य म्हणजे एक टक्क्याच्या आसपास जनता साक्षर होती त्या काळात आपल्या चळवळीच्या कार्याचा प्रचार प्रसार करण्यासाठी मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात केली होती. आज समाजात ८६ टक्के जनता साक्षर आहे. अशावेळी समाजात परिवर्तनवादी चळवळीच्या चालक, मालक व वाहक यांनी आपल्या स्वतंत्र विचारांच्या प्रचार प्रसार करण्यासाठी कशाप्रकारे वर्तमानपत्रे चालविली आहेत? याचा शोध घेणे आवश्यक आहे. मेडिया अर्थात प्रसार माध्यमाशिवाय काही होऊ शकत नाही असे ऊर बडवून सांगणा-यांनी सुद्धा पर्याय उपलब्ध करून जनसामान्यांपर्यंत त्याची व्याप्ती वाढविली तरच जनतेचे जनमत संघटीत करने शक्य होईल. अन्यथा शासनकर्ती जमात होण्याची स्वप्न पाहणे हे दिवास्वप्न ठरेल, यात तिळमात्र शंका नाही.

विषमतेचे माहेरघर असलेल्या भारतीय समाजात ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. अशी वर्णव्यवस्थाकृत परिस्थिती होती, म्हणून खालच्या मजल्यावरील इसम मग तो कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जीना उपलब्ध नव्हता. तर वरच्या मजल्यावरील माणूस कितीही नालायक असो त्याला खाली लोटून देण्याची कुणात हिंमत होत नसायची. अर्थात उच्च जातीत जन्मलेला मग तो कितीही अवगुणी असो, तो उच्च म्हणावयाचा तसेच नीच जातीत जन्मलेला मग तो कितीही गुणी असो, तो नीचच राहावयाचा. रोटी बेटी व्यवहारा अभावी स्पृश्यास्पृश्य भावनेने इतकी भर टाकलेली होती की, सर्व जाती या हिंदू समाजाचा अविभाज्य भाग असल्या तरी त्या समाज बाह्य असल्याची वास्तविकता होती.

ज्यामुळे त्या काळात समाज हिंदू धर्मीय ब्राह्मण, ब्राह्मणेत्तर व बहिष्कृत अशा तीन वर्गात विभागल्या गेला होता. परिणामी वर्णवर्चस्वाच्या प्रभावामुळे ब्राह्मण हे ब्राह्मणेत्तरांकडून सेवा करवून घेऊन मेवा खात होते. अज्ञानी व्यक्ती कडून काहीही करून घेता यावे म्हणून ज्ञानाची मिरासदार ब्राह्मणांनी स्वत:कडे वर्गीकृत केली होती. परिणामी दीर्घकाळ पर्यंत ब्राह्मणेत्तर मागासलेले राहिल्याने त्यांची उन्नती खुंटली. अशाप्रकारे दौर्बल्य, दारिद्य व अज्ञान या त्रिवेणी संगमातून बहिष्कृत, अस्पृश्य, वंचित बहुजन समाजाची अपरिमित हानी झाली होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी अस्पृश्यांच्या हिताची चर्चा करणारी सोमवंशीय मित्र, हिंदू नागरिक, विटाळ विध्वंसक इत्यादी पत्रे उपजली व लय ही पावलीत. मात्र दीनमित्र, जागरूक, डेक्कन रयत, विजयी मराठा, ज्ञानप्रकाश, सुबोध पत्रिका यासारखी बुद्धीवादी पत्रे तत्कालीन परिस्थितीत सुद्धा सुरू होती. अशा वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक ची सुरवात केली.

त्या काळात बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीच्या बातम्या इतर वर्तमानपत्रे प्रसिद्ध करीत नव्हते, असा काही फारसा मुद्दा नव्हता. इतर अनेक वर्तमानपत्रे बातम्या निश्चित प्रसिद्ध करीत होते. मात्र नेमकेपणाने जे मांडले जाणे अपेक्षित होते ते मात्र होत नव्हते. म्हणून आपणांस हवे ते, हव्या त्या प्रमाणात योग्य पद्धतीने सविस्तर मांडण्यासाठी आपल्या स्वतंत्र वर्तमानपत्राची निकड भासल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० ला मूकनायक या पाक्षिकाची सुरूवात केली. या पाक्षिकात अग्रलेख, क्षेम समाचार, शेला पागोटे, कुशल प्रश्न, विविध विचार, वर्तमानसार, आमची जखम, आमची हालचाल इत्यादी सदर चालविली जात होती. ज्याचा पी. एन. भटकर हे सुरुवातीला संपादक होते. मूकनायकचा नोंदणी क्रमांक १४३० असा होता.

आजच्या काळात बहुजन समाजातील पक्ष, संघटना, संस्थ्याच्या अपवादात्मक बातम्या प्रस्थापित वर्तमानपत्रात येत असतात. ज्यात प्रास्ताविक, सुत्रसंचालन, आभार व अध्यक्षता कुणी केली? भाषणे कुणी दिली? याचा उल्लेख तर असतो सोबत कार्यकर्त्यांचा नामोल्लेख केलेला असतो, त्यावर ही कार्यकर्ते वर्तमानपत्रात नाव छापून आल्याबद्दल आनंदी असतात. मात्र कार्यक्रमात मुद्यांवर जे काही मांडले जाते त्याचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळला जातो याचे कार्यकर्त्यांना भानच नसते. उलटपक्षी ते जास्त महत्त्वपूर्ण असते. करिता वर्तमानपत्रात केवळ न्यूज नव्हे! तर व्ह्यूज अर्थात व्यक्त होणाऱ्याचा दृष्टीकोन समोर येण्याची आवश्यकता असते. म्हणून आपण व्ह्यूज प्रकाशित करणारी परिवर्तनवादी विचारांच्या प्रसार माध्यमांना, वर्तमानपत्राना चालना देऊन त्यांना आपण वाचकवर्ग मिळवून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. वर्तमान पत्र वाचताना दोन ओळीतील व दोन ओळी मागील अर्थ समजून घेण्याचा नीटसा प्रयत्न केला पाहिजे. आपली परिवर्तनवादी वर्तमानपत्रे चालविणे, टिकविणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आहे. ती आपण कर्तव्य भावनेने पार पाडली पाहिजे.

मूकनायकच्या द्वितीय अंकातील 'स्वराज्याची सर सुराज्याला नाही!' या अग्रलेखात हिंदी लोक स्वयंशासित नाहीत तर परशासित आहेत. राज्य करण्याचे दोन मुख्य हेतू असतात एक म्हणजे शासन करने व दुसरे म्हणजे संस्कृती टिकविणे होय. हे नमूद करताना इंग्रजी विद्या म्हणजे केवळ "वाघिणीचे दुध" ते ज्यांना प्राशन करावयास सापडेल त्यांच्यात नवा उत्साह, नवीन तेज, नवीन स्फुर्ती उत्पन्न होईल हे स्पष्ट केले आहे. परिणामी हे वाघिणीचे दुध पिऊन पुष्ट झालेल्या पिल्लांनी इंग्रजांच्या सत्तेच्या विरुद्ध प्रजा पक्षाच्या वतीने भांडण्यास सुरूवात केली. याची पुनरावृत्ती पुनरावृत्ती होऊ नये याची जाणीव शासकांना असते. म्हणून ते जनतेला व्यापक प्रमाणात जागृत करीत नसतात. करिता आपल्या देशातील उच्च दर्जाचे शिक्षण देण्याऐवजी शाळाच बंद करण्याचा घाट घातला जात आहे. तर जे काही शिक्षण दिले जाते ते संबंधित विद्यार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी सक्षम ठरत नसल्याने बेरोजगारांच्या फौजा निर्माण होत आहेत.

वर्तमान काळात परिवर्तनवादी चळवळीच्या पार्श्वभूमीवर चालविल्या जाणाऱ्या प्रसार माध्यमांचे वाहक होणे आवश्यक आहे. देशात भारताचे संविधानाला अनुरुप विधायिका, कार्यपालिका, न्यायपालिका व प्रसार माध्यमे या लोकशाहीच्या चारही स्तंभाना बळकटी प्राप्त करून देण्यासाठी प्रसार माध्यमांनी, वृत्तपत्रांनी आपल्या लेखणीचा वापर केला पाहिजे. जेणेकरून या देशातील सर्व नागरिकांना त्यांचे मानवीय हक्क अधिकार उपभोगता आली तर भारतीय सभ्य समाजाची निर्मिती होऊ शकेल. याचे भान ठेवून प्रस्थापित प्रसार माध्यमांना झिडकारून परिवर्तनवादी प्रसार माध्यमांना स्थापित करण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या ऊर्जेचा वापर केला पाहिजे. परिणामी मूकनायकला अपेक्षित प्रसार माध्यमांचा समाज जीवनात उत्कर्ष होईल.

जेणेकरून भारताचे संविधानाला अपेक्षित एकजिनसी भारतीय समाज तयार होईल. करिता आपण सर्वांना ऐतिहासिक मूकनायकच्या वर्धापनदिनानिमित्त कोटी कोटी सदिच्छा व्यक्त करतो.




**लेखक : बी. बी. मेश्राम,**
संचालक : फुले शाहू आंबेडकराइट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.संपर्क : ९४२१६७८६२८
stdbbm@gmail.com


# आप म्हणजे खोटे, फसवणूक, धोखा- अमित शहा



**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी आज रोहिणी येथील सभेत सांगितले की, केजरीवाल म्हणायचे की ते यमुनेचे पाणी लंडनमधील थेम्स नदीसारखे बनवतील आणि ते स्वतः त्यात डुबकी मारतील. पण केजरीवाल आजपर्यंत का डुबकी घेत नाहीत?

शहा म्हणाले की, आप म्हणजे खोटे, फसवणूक आणि धोका. यमुना प्रदूषित करून केजरीवाल यांनी दिल्लीतील जनतेला प्रदूषित पाणी प्यायला भाग पाडले आहे. 'आप'ने जल बोर्डाला शुद्ध पाणी देण्यासाठीचा सर्व पैसा भ्रष्टाचारासाठी अर्पण केला आहे.

ते म्हणाले- निवडणूक जिंकण्यासाठी केजरीवाल यांनी खोटे बोलणे बंद करावे. केजरीवाल म्हणाले होते की, दिल्लीतील लोकांना त्रास देण्यासाठी भाजपच्या लोकांनी हरियाणातून यमुनेत विष मिसळले आहे.

शहा म्हणाले- केजरीवाल यांनी सांगावे कोणते विष मिसळले आहे, कोणत्या प्रयोगशाळेत चाचणी झाली आहे, त्याचे नाव सांगा. निवडणुकीतील पराभव केजरीवाल यांना माहीत आहे म्हणूनच ते असे हलके राजकारण करत आहेत.

१. हॉस्पिटलच्या खोल्या दुप्पट करणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. खोल्यांची संख्या एकानेही वाढवली नाही, पण दिल्लीतील लोकांसाठी ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार बंद करण्याचे कामही त्यांनी केले. दिल्लीतील जनतेने भाजपचे सरकार बनवावे, पहिल्या मंत्रिमंडळात दिल्लीतील लोकांना १० लाख रुपयांपर्यंतच्या ऑपरेशन्ससह मोफत उपचार देण्याचे काम भाजप करणार आहे.

२. निवासी भागातील दारूची दुकाने बंद करणार असल्याचे केजरीवाल म्हणाले होते. पण रहिवासी भाग सोडून त्यांनी शाळा आणि मंदिरांजवळ दारूची दुकानेही उघडली. केजरीवाल यांनी हजारो कोटी रुपयांचा दारू घोटाळा केला. त्यामुळे ते तुरुंगात गेले.

३. ५ तारखेला दिल्लीतील जनतेला 'आप'ला हटवण्याची आणि मोदीजींच्या नेतृत्वाखाली डबल इंजिन सरकार बनवण्याची संधी आहे. कमळाच्या चिन्हाचे बटण दाबून भाजपचे सरकार बनवायचे आहे. बटण इतकं दाबावं की केजरीवालांच्या शीशमहालाची काच फुटायला हवी.

४. भाजप जिंकली तर दिल्ली सुंदर होईल, कचऱ्याचे डोंगर संपतील. भाजप सरकार दिल्लीला भ्रष्टाचारमुक्त करेल, रस्ते आणि गल्ल्या स्वच्छ करेल आणि पाण्याचे व्यवस्थापनही करेल.

५. आम्ही ठरवले आहे की, भाजपचे सरकार आल्यानंतर प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी आम्ही प्रत्येक आई आणि बहिणीच्या बँक खात्यात थेट २,५०० रुपये देऊ. आमचे सरकार प्रत्येक गर्भवती महिलेला २१ हजार रुपये देणार आहे. एलपीजी सिलिंडर ५०० रुपयांना मिळणार असून प्रत्येकी एक सिलिंडर दिवाळी आणि होळीमध्ये मोफत मिळणार आहे.